MHOS090013782024

**<u>आदेश नि.क्र. ५२ वर</u>**

अर्जदार वादीने प्रस्तुत अर्ज वादी क्र. २ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेकामी दिलेला आहे.

२. वादी/अर्जदाराचे कथन असे की, दिनांक ११/०७/२०२५ रोजी वादी क्र. २ सत्यभामा मल्लीकार्जून घोडके या मयत झालेल्या आहेत. सदर मयताचे वारस मुदतीत दाव्यामध्ये समाविष्ट करणे आवश्यक होते परंतू काही महत्वाची कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने मुदतीत वारस अभिलेखावर घेऊ न शकल्यामुळे अबेटमेंट चा आदेश झालेला आहे. त्यामुळे वादी क्र.२ विरुध्द अबेटमेंट चा आदेश रद्द होण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले होते. प्रतिवादी यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. वादीने वादी क्र.२ सत्यभामा मल्लीकार्जून घोडके मयत झाल्याचे कथन प्रस्तुत अर्जामध्ये केले आहे. दस्त यादी निशाणी क्र. ४५ वर वादीने वादी क्र.२ चे मृत्यू प्रमाणपत्राची प्रत दाखल केली आहे. तसेच प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. दावा गुणदोषांवर निकाली काढण्याकरीता वादी/ अर्जदार यांचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित आहे. करीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करते.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज (नि.क्र.५२) मंजुर करण्यात येतो.

२. मयत वादी क्र. २ विरुध्दचा अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

Sd/-
(अमृता धोंडीराम जाधव)
३रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
कळंब.

दिनांक ०९/०६/२०२६